**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १६० वा | रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूर भाजपात सत्तासंघर्ष; महापौरपदावरून कोठे-देशमुख आमनेसामने










**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर महापौरपद भाजपकडेच जाणार, हे निश्चित असतानाही आता महापौर निवडीवरून भाजपमध्ये अंतर्गत संघर्ष उफाळून आला आहे. आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार सुभाष देशमुख व विजय देशमुख या दोन्ही गटांमध्ये महापौरपदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू आहे.

महापालिकेच्या निवडणुकीत भाजपने एकूण ८७ जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यामुळे भाजपचाच महापौर होणार, याबाबत कोणतीही शंका नाही. मात्र, महापौर कोण होणार यावरून पक्षातील दोन प्रभावी गट आमनेसामने आले आहेत.

आमदार देवेंद्र कोठे यांनी आपल्या गटातील विनायक कोंडयाल यांना महापौरपदाच्या खुर्चीत बसवण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. दुसरीकडे, उमेदवार निवडीत डावलल्याचा ठपका ठेवत आमदार सुभाष देशमुख आणि विजय देशमुख यांनी कोठे गटाविरोधात दंड थोपटले असून, त्यांच्या गटातून डॉ. किरण विजयकुमार देशमुख यांच्या नावासाठी ते आग्रही आहेत.

भाजपमधील या अंतर्गत संघर्षामागे घराणेशाहीचा मुद्दा ही चर्चेत आहे. दिवंगत विष्णुपंत कोठे यांच्या काळापासून सोलापूर महापालिकेवर कोठे घराण्याचे वर्चस्व राहिले आहे. आमदार देवेंद्र कोठे यांना (पान 2 वर..)

## भाजपाच्या उमेदवार विमलताई खताळ यांना विरवडे बु, शिरापूर (मो), पिरटाकळी येथे मतदारांचा प्रचंड प्रतिसाद

## कामती गणात गावभेट दौऱ्यात उत्साही स्वागत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील कामती जिल्हा परिषद गटाच्या भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवार विमलताई तानाजीराजे खताळ यांनी कामती पंचायत समिती गणातील विरवडे बुद्रुक, शिरापूर (मो) व पीरटाकळी या गावभेट दौरा केला. या तिन्ही ही गावातील नागरिकांनी त्यांचे उत्साहात स्वागत करून प्रचंड प्रतिसाद दिला. तर स्व.तानाजीराजे खताळ यांच्या आठवणीना उजाळा दिला.

**पक्षाची ताकद व स्व.तानाजीराजेंच्या कामामुळे यश निश्चित**

माझे पती स्व. तानाजीराजे खताळ यांनी या जिल्हा परिषद गटाचे नेतृत्व केलेलेआहे आज कामती गणातील विरवडे, शिरापूर व पिरटाकळी गावातील नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या भेटी घेत असताना स्व.तानाजीराजे खताळ यांनी या मतदारसंघात सर्व नेत्यांशी व कार्यकर्त्यांशी ठेवलेले स्नेहसंबंध दिसून आले. त्यांनी केलेल्या कार्याच्या जोरावरच मला पक्षश्रेष्ठींनी उमेदवारी दिली आहे. निश्चितच पक्षाची ताकद व स्व. तानाजीराजे खताळ यांचे कार्य या दोन्हीच्या संगमामुळे मला निश्चितपणे मोठे यश मिळेल

**- विमलताई तानाजीराजे खताळ,** उमेदवार



महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मोहोळ तालुक्याचे विकासप्रिय माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विमलताई तानाजीराजे खताळ यांना भाजपा पक्षाने अधिकृत उमेदवारी दिली आहे. प्रचार सुरू होण्यापूर्वीच विमलताई खताळ यांनी गावातील प्रमुख नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या तसेच मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर जोर दिला आहे. याचाच भाग म्हणून विरवडे बुद्रुक, शिरापूर (मो) व पीरटकळी या तिन्ही गावात गाव भेट दौरा केला.

यावेळी गावातील नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. व माजी जिल्हा परिषद स्व. तानाजीराजे खताळ यांनी गावाच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाची आठवण करून दिली.

## मानेगाव गटात भाजपकडून गावभेटी, थेट संवादावर भर

## रणजितसिंह शिंदे, प्रा. शिवाजी सावंत यांच्या उपस्थितीत प्रचाराचा शुभारंभ

**माढा (कटूसत्य वृत्त):-** मानेगाव जिल्हा परिषद गटात भाजपचा प्रचार सध्या चांगलाच वेग घेत असून, संघटनात्मक ताकद, अनुभवी नेतृत्व आणि स्थानिक प्रश्नांच्या अचूक मांडणीच्या जोरावर पक्ष निवडणुकीच्या रिंगणात आघाडी घेण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपचे अधिकृत जिल्हा परिषदेचे उमेदवार पृथ्वीराज सावंत यांनी प्रचाराला स्पष्ट दिशा देत गावभेटी, बैठका आणि थेट मतदारसंवाद यावर भर दिला आहे.



रांजणी येथे झालेल्या प्रचाराच्या शुभारंभ कार्यक्रमाला भाजप नेते रणजितसिंह शिंदे, राजवी ॲग्रोचे चेअरमन प्रा. शिवाजी सावंत तसेच माढा तालुक्यातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी विजयाचा निर्धार व्यक्त करत, विकासकेंद्रित धोरण आणि समस्या-निराकरणावर आधारित प्रचाराची भूमिका स्पष्ट करण्यात आली.

मानेगाव गटातील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, शेतीपूरक सुविधा, युवकांसाठी रोजगाराच्या संधी, तसेच आरोग्य व शिक्षण सुविधा हे प्रश्न प्रचाराच्या केंद्रस्थानी आहेत. पृथ्वीराज सावंत यांनी गावोगावी जाऊन शेतकरी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. केवळ आश्वासनांपुरता नव्हे, तर वेळबद्ध व ठोस उपाययोजनांचा आराखडा मांडण्यावर त्यांनी भर दिला आहे.

यावेळी बोलताना रणजितसिंह शिंदे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती देत, त्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी भाजप कटिबद्ध असल्याचे सांगितले. पाणी, रस्ते, वीज, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांसाठी भाजपने केलेल्या कामांचा त्यांनी आढावा घेतला. प्रा. शिवाजी सावंत यांनी स्थानिक उद्योजकता, कृषी प्रक्रिया उद्योग, शेतीमालाला मूल्यवर्धन आणि रोजगारनिर्मितीच्या संधी वाढवण्याची गरज अधोरेखित केली. मानेगाव गटाच्या सर्वांगीण विकासासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत विकासदृष्टी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

संघटनात्मक ताकद, समन्वयित प्रचारयंत्रणा आणि अनुभवी नेतृत्वाच्या उपस्थितीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून, गावपातळीवर प्रचार अधिक तीव्र करण्यात येत आहे. एकूणच, मानेगाव जिल्हा परिषद गटात भाजपचा प्रचार विकासाचा ठोस अजेंडा, स्थानिक मुद्द्यांची स्पष्ट मांडणी आणि जनतेशी थेट संवाद यावर उभा राहताना दिसत आहे.



## संपादकीय

# दोन कंटेनर, ४०० कोटी व गुलाबी नोटांचे गूढ

## नोटाबंदीच्या 'यशा'वर पडलेला आणखी एक प्रश्नचिन्ह

चोर्ला घाटात दोन कंटेनरमधून तब्बल ४०० कोटी रुपयांच्या दोन हजार रुपयांच्या गुलाबी नोटा सापडल्याची घटना ही केवळ चोरीची किंवा लुटीची बातमी नाही; ती भारताच्या आर्थिक धोरणांवर, नोटाबंदीच्या दाव्यांवर आणि सत्ताधाऱ्यांच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी घटना आहे. विशेष म्हणजे या नोटा अधिकृतरीत्या चलनातून बाद झाल्यानंतरही इतक्या मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात कशा राहिल्या, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

२०१६ मध्ये नोटाबंदी जाहीर करताना तत्कालीन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन हजार रुपयांची गुलाबी नोट 'काळ्या पैशावर निर्णायक आघात' म्हणून देशासमोर मांडली होती. मात्र काही वर्षांतच हीच नोट काळ्या पैशाचं प्रमुख साधन बनल्याचं वास्तव विविध कारवायांतून समोर आलं. आता चोर्ला घाटातील कथित लुटीत सापडलेल्या ४०० कोटींच्या गुलाबी नोटा म्हणजे नोटाबंदीच्या धोरणाचं आणखी एक अपयशी पर्व असल्याचं चित्र आहे.

या प्रकरणात पैशांचा प्रवास कर्नाटक ते अहमदाबाद असा असल्याची चर्चा आहे. नाशिक, हवाला नेटवर्क, संदिप पाटील यांसारखी नावं चर्चेत येत आहेत. मात्र या सगळ्याच्या मुळाशी नेमका कोण आहे, हे शोधण्याची तयारी यंत्रणांकडे आहे का, हाच खरा प्रश्न आहे. नेहमीप्रमाणे हे प्रकरणही एखाद्या ‘एक साहेब' या अस्पष्ट शब्दात गुंडाळून मोकळे होणार का, अशी शंका व्यक्त होत आहे.

अधिक गंभीर बाब म्हणजे चलनातून बाद झालेल्या नोटा इतक्या मोठ्या प्रमाणावर कोणाच्या संरक्षणाखाली साठवण्यात आल्या? बँकिंग प्रणाली, आयकर विभाग, ईडी, डीआरआय, सीबीआय यांसारख्या यंत्रणांना याचा सुगावा कसा लागला नाही? की लागूनही दुर्लक्ष करण्यात आलं? जर हे पैसे हवाला व्यवहारातून जात असतील, तर ते कोणाच्या आशीवार्दाने?

सरकार नोटाबंदीला आजही 'अभूतपूर्व यश' म्हणत असेल, तर चोर्ला घाटातील हा गुलाबी नोटांचा कंटेनर नेमका काय सांगतो? काळा पैसा संपला की फक्त मार्ग बदलला? सामान्य नागरिकाने बँकेच्या रांगेत उभं राहून जे हाल सोसले, ते फक्त शोभेपुरते होते का?

आज गरज आहे ती घोषणांची नाही, तर उत्तरांची. हे पैसे कुणाचे होते? कोणासाठी आणि कुठे नेतले जात होते? या व्यवहारामागे राजकीय संरक्षण आहे का? आणि सर्वात महत्त्वाचं, याची स्वतंत्र, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी होणार की हे प्रकरणही काळाच्या पडद्याआड जाईल?

जर चारशे कोटी रुपयांच्या गुलाबी नोटांचा कंटेनरही व्यवस्थेच्या रडारवर येत नसेल, तर मग काळ्या पैशाविरोधातील लढा हा केवळ भाषणांपुरताच मर्यादित आहे, असंच म्हणावं लागेल. चोर्ला घाटातील ही घटना केवळ लूट नसून, नोटाबंदीच्या कथित यशावर उमटलेला एक ठळक काळा डाग आहे.

# जे भारतात कळत नाही, ते अमेरिकेत उघड होतं

## माहितीचा अंधार आणि लोकशाहीचा प्रश्न

लोकशाही व्यवस्थेत जनतेला सत्य जाणून घेण्याचा अधिकार असतो, असे आपण सैद्धांतिकदृष्ट्या मान्य करतो. मात्र प्रत्यक्षात भारतात अनेक गंभीर घटनांची माहिती भारतीय नागरिकांपर्यंत पोहोचतच नाही, किंवा ती जाणीवपूर्वक अपुरी ठेवली जाते, हे वारंवार दिसून येते. विशेष म्हणजे अशाच घटनांवर परदेशात विशेषतः अमेरिकेत मात्र खुलेपणाने चर्चा होत असल्याचे चित्र समोर येत आहे.

अहमदाबाद येथे काही काळापूर्वी घडलेल्या एअर इंडिया विमान अपघाताचे उदाहरण यासाठी बोलके आहे. भारतात हे प्रकरण काही दिवसांतच शांत झाले, चौकशी अहवाल, जबाबदारी निश्चिती आणि प्रणालीतील त्रुटी याबाबत सार्वजनिक चर्चा मर्यादित राहिली. मात्र त्याच घटनेच्या संदर्भात अमेरिकन सिनेटमध्ये प्रश्न उपस्थित केले जात असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. हा विरोधाभास नेमका काय दर्शवतो?

या विमानाबाबत अपघातापूर्वी तांत्रिक त्रुटी आढळल्याच्या नोंदी असल्याचे मुद्दे परदेशी चर्चांमध्ये पुढे येत आहेत. इलेक्ट्रिकल फायर, वायर डॅमेज, शॉर्ट सर्किट, पॅनल ओव्हरहिटिंग, तसेच २०२२ मध्ये दोन वेळा लागलेल्या आगीसारख्या घटनांचा उल्लेख होत आहे. हे तपशील जर खरे असतील, तर ते केवळ तांत्रिक अपयश न राहता प्रवासी सुरक्षेबाबतच्या गंभीर दुर्लक्षाचे द्योतक ठरतात. प्रश्न असा आहे की ही माहिती भारतीय जनतेसमोर का आली नाही, किंवा का आणली गेली नाही?

अमेरिकेत अशा घटनांवर संसदीय पातळीवर चर्चा होऊ शकते, तर भारतात त्याच विषयावर मौन का पाळले जाते? ही केवळ माहितीची कमतरता नाही, तर पारदर्शकतेचा अभाव आहे. लोकशाहीत सरकार जनतेपुढे उत्तरदायी असते, पण माहितीच जर दडपली गेली, तर उत्तरदायित्वाची संकल्पनाच पोकळ ठरते.

आज भारतीय जनतेला अंधारात ठेवण्याची एक सवयच जणू लावली गेली आहे. त्यामुळे 'जनतेला कळायची गरज नाही' असे गृहीत धरले जाते. प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही ठरवले जाते, चौकशी मागणाऱ्यांना संशयाच्या नजरेने पाहिले जाते. अशा वातावरणात सत्य बाहेर येण्याऐवजी ते सीमापार जाऊन उघड होते, हीच खरी शोकांतिका आहे.

हा प्रश्न केवळ एका विमान अपघाताचा नाही. हा प्रश्न आहे. आपण कोणत्या प्रकारची लोकशाही जगतो आहोत याचा. जिथे माहिती परदेशी संसदेत चर्चेचा विषय ठरते, पण देशातील नागरिकांसाठी ती 'असंवेदनशील' किंवा 'अप्रासंगिक' मानली जाते.

जर नागरिकांना सत्य समजण्याचा अधिकार नसेल, तर निवडणुका, घोषणा आणि भाषणांचा उपयोग काय? आज गरज आहे ती स्पष्ट, स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशीची आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, त्या चौकशीतील निष्कर्ष निर्भीडपणे जनतेसमोर मांडण्याची. अन्यथा 'जे भारतात कळत नाही, ते अमेरिकेत कळतं' हे वाक्य फक्त टीका न राहता आपल्या व्यवस्थेचं वास्तव बनून राहील.

# लोकशाही व निवडणूक: भाग १






भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १६ जून १९४९ रोजी संसदेतील आपल्या भाषणात म्हणाले होते – 'आपल्या लोकशाही व्यवस्थेचा पाया म्हणजे निवडणूक प्रक्रिया. लोकांनी आपले प्रतिनिधी स्वतंत्रपणे, कोणत्याही दडपणाविना निवडले पाहिजेत. जर निवडणुका निष्पक्षपणे झाल्या नाहीत, तर संपूर्ण लोकशाही यंत्रणाच कोलमडून पडेल. म्हणूनच आज मी ज्या तरतुदी मांडत आहे त्यांचा उद्देश एकच आहे – भारतामध्ये एक स्वतंत्र, स्वायत्त आणि निर्भय निवडणूक आयोग उभा करणे. भारतासारख्या विशाल व विविधतेने नटलेल्या देशात निवडणूक आयोगाचे स्थान हे अत्यंत महत्वाचे आहे. निवडणुकीचे नियम, मतदार याद्या, मतदारसंघांची आखणी, मतदानाची प्रक्रिया आणि निवडणूक निकाल यांपैकी कोणत्याही बाबतीत सरकार किंवा सत्ताधारी पक्षाचा हस्तक्षेप होऊ नये. निवडणुका नियंत्रित करणारी यंत्रणा जर सरकारच्या अधिपत्याखाली असेल, तर निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे राहील आणि लोकांचा विश्वास ढळेल. आयोगाला मतदार याद्यांच्या तयारीचा, निवडणूक कार्यक्रम आखण्याचा, निवडणूक प्रक्रियेत शिस्त राखण्याचा आणि निकाल जाहीर करण्याचा पूर्ण अधिकार असावा अशी स्पष्ट धारणा आहे. हे अधिकार केवळ कायदेशीर स्वरूपाचे नसून लोकशाहीच्या पावित्र्याचे रक्षण करण्यासाठी अपरिहार्य आहेत. लोकशाहीत निवडणूक व्यवस्थेची स्वायत्तता हा सर्वात मोठा पाया आहे. हा पाया मजबूत नसेल, तर लोकशाही ही केवळ नावापुरतीच राहील. म्हणूनच निवडणूक आयोगाला असे संरक्षण देत आहोत की कोणत्याही सरकारला, कोणत्याही पक्षाला आणि कोणत्याही दबावगटाला त्याच्या कार्यात हस्तक्षेप करता येणार नाही. या तरतुदी स्वीकारल्या गेल्यास भारतात निवडणूक प्रक्रिया ही संपूर्णपणे निष्पक्ष, स्वायत्त आणि लोकशाही मूल्यांशी सुसंगत राहील'.

त्याच भाषणात ही भीतीदेखील वर्तवली होती की, 'भविष्यात निवडणूक आयोग गुलाम अथवा सत्तेसमोर झुकणारा असू शकतो. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, संतुलित व स्वतंत्र पद्धतीने होण्याकरता स्वतंत्र, स्वायत्त व कोणत्याही हस्तक्षेपापासून मुक्त असा निवडणूक आयोग असायला हवा. मुख्य उद्देश निवडणुका स्वतंत्र आणि निष्पक्ष राहाव्यात हा आहे. लोकशाही देशात सत्ताधारी पक्ष प्रशासनिक यंत्रणा वापरून निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करतोय अशी किंचितही शंका निर्माण होऊ नये. त्यामुळे निवडणुकांची व्यवस्था हण्याचे काम ज्या संस्थेकडे असेल ती संस्था कार्यकारी शासनापासून स्वतंत्र असणे अत्यावश्यक आहे. आपल्या लोकशाहीचे यश ह्या आयोगाने स्वायत्तपणे आणि प्रामाणिकपणे काम करण्यावर अवलंबून आहे'.

बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेल्या निकषांच्या आधारावर निवडणूक आयोग व यंत्रणा किती स्वतंत्र, स्वायत्त, पारदर्शक व निष्पक्षपणे काम करत आहे याचे मूल्यमापन नागरिकांनी करणे आवश्यक आहे. त्यासाठी काही मुद्दे समजून घेऊ.

१) निवडणूक आयुक्त निवडण्याच्या पॅनलमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा सहभाग टाळून दोघेजण सत्ताधारी पक्ष नेमणार आणि एकाची नेमणूक विरोधी पक्षाकडून होईल असा निर्णय घेण्यात आला आहे. यात 'स्वारस्य संघर्ष' (कॉन्फ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट) आहे असे समजता येणार नाही का ?

२) २०२३ च्या हिवाळी अधिवेशनात, म्हणजेच २०२४ च्या लोकसभा निवडणुकांच्या आधी संसदेमध्ये जवळपास १४६ खासदारांचे निलंबन करण्यात आले आणि नेमके त्याच वेळी 'चीफ इलेक्शन कमिशनर बिल, २०२३' पास केले गेले आणि घाईघाईने २ जानेवारी २०२४ रोजी अधिसूचित करण्यात आले. या विधेयकात एक अट आहे. या अटीद्वारे निवडणूक आयुक्तांना त्यांच्या कारकिर्दीत दिवाणी व फौजदारी प्रकरणांपासून विशेष सुरक्षा देण्यात आली आहे. प्रश्न असा की या कवच कुंडलांचा फायदा कोणाला?

३) हरियाणा उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला ९ डिसेंबर २०२४ रोजी मतदानाचे सीसीटीव्ही फूटेज देण्याचे आदेश दिले. १७ डिसेंबर २०२४ रोजी, म्हणजे आठवड्याभरात निवडणूक आयोगाने कायदा व न्याय मंत्रालयाला निवडणुकीच्या नियम क्रमांक ९३ मध्ये सुधारणेबाबत पत्र लिहिले. ते पत्र १९ डिसेंबरला मिळाले. २० डिसेंबरला आयोगाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चेनंतर मजकुरातील भाषेबद्दल सुधारणा सुचवल्या. त्याच दिवशी ताबडतोब अधिकाऱ्यांनी त्या मान्य केल्या आणि त्याच दिवशी या सुधारणा मान्य होऊन आवश्यक त्या सर्व अधिकाऱ्यांची मंजुरी मिळाली. रात्री १० वाजून २३ मिनिटांनी शिक्कामोर्तब झाले. म्हणजे चर्चा, आक्षेप, सुधारणा, दुरुस्ती, मान्यता, परवानगी, शिक्कामोर्तब वगैरे सगळं झालं ४८ तासात. जर निवडणुकीत किती मतदार होते ही माहिती जाहीर झाली असती तर देशाला कोणता मोठा धोका होता?

४) निवडणूक आयोगाने १२ नोव्हेंबर २०२५ ला न्यायालयात सांगितले की २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीचे सर्व सीसीटीव्ही फूटेज त्यांनी डिलीट केले आहे. लोकसभा निवडणुकीबाबतच्या घोटाळ्यांच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर आपली निष्पक्षता सिद्ध करण्याची संधी निवडणूक आयोगाकडे होती. असे असताना फूटेज संपवण्याची घाई का केली? विरोधी पक्षाकडून किंवा पत्रकार परिषदेत सीसीटीव्ही फूटेजबद्दल प्रश्न उपस्थित केले जात असताना 'आम्ही लेकी–सुनांचे फोटो/व्हिडिओ कसे काय दाखवणार? असे उत्तर देणाऱ्या निवडणूक आयोगाने बिहारमधल्या मतदानानंतर अनेक लेकी–सुनांचे फोटो सोशल मीडियावर प्रकाशित केले. असे असताना हेतूवर संशय घेणे स्वाभाविक नाही का?

५) चंडीगढसारख्या एका शहराच्या महापौरपदाच्या निवडणुकीत उघडपणे केलेला पक्षपात पाहिला की सत्तेसाठी ते कोणत्याही थराला जातात हे स्वच्छपणे दिसते. अधिकारपदावर असणारी व्यक्ती एका पक्षाला धार्जिणी भूमिका उघडपणे घेत होती हे त्या घटनेमधून स्पष्ट होते आणि जर ते गैरकृत्य उघड झाले नसते तर प्रत्यक्ष निकालही बदलण्यात आला असता.

६) १५ वर्षांपासून महाराष्ट्र आणि हरियाणा निवडणूक एकत्र होत होती. पण निवडणूक आयोगाने 'महाराष्ट्रात सण आहे' असे हास्यास्पद कारण देत आधी हरियाणाच्या निवडणूक घेण्याचे ठरवले.त्याचा नेमका उद्देश कोणता?

७) निवडणूक आयोगाने राजस्थानमधील अशोक गेहलोत सरकारची 'स्मार्ट फोन योजना' थांबवली, तेलंगणा मध्ये २०१८ पासून सुरु असलेली 'रायथु बंधू योजना' ज्यात शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जात होती ती थांबवायला लावली, आंध्र प्रदेशमधली स्त्रियांना अर्थसहाय्य्य करणारी 'वायएसआर चेयुथा' योजना थांबवली, ओडिसामधील एक योजना थांबवायला लावली. पण बिहारमध्ये महिलांना आर्थिक मदतीची केवळ घोषणाच केली गेली असे नाही तर टप्प्याटप्प्यात, मतदानाच्या काही दिवस आधी महिलांच्या खात्यामध्ये पैसे टाकले गेले. हे होऊ देणे निष्पक्षतेच्या व्याख्येत बसते का? बिहारमध्ये निवडणूक आयोगाने सहाय्यक म्हणून 'जीविका दीदी' नेमल्या. सर्वप्रथम त्यांच्या खात्यात १०,०००/– रुपये जमा केले. निवडणूक आयोगाला मदत करणाऱ्या या जीविका दीदींनी निवडणूक कामाच्या जागी बिहारच्या सत्ताधारी पक्षाचा प्रचार करत असल्याचे अनेक पुरावे उपलब्ध असताना दोन्ही बाजूच्या पक्षांना समान संधी उपलब्ध आहे असे कसे म्हणता येईल?

८) दुबार मतदार अथवा एकाच पत्त्यावर अनेक मतदार असल्याचे आरोप केवळ विरोधी पक्षांकडूनच नाही तर सत्ताधारी पक्षातील नेत्यांकडून झाल्याचे दिसून येते. मुंबईमध्ये एकाच घरात ५०० मतदार असल्याचे कोणी म्हटले तर विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाविरोधात केलेल्या आंदोलनांनंतर कोणी पत्रकार परिषद घेऊन आरोप केले की अनेक ठिकाणी लाखो मुस्लिम दुबार मतदार आहेत. उत्तर प्रदेश मुख्यमंत्री यांनी तर करोडो मतदार यादीतून नाहीसे झाल्याचा आरोप केला. थोडक्यात मतदार यादीमध्ये घोटाळे असल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसते. परंतु असे होत असतानाही जर त्यांच्या पक्षाला काळजी वाटत नसेल तर त्यात त्यांचा फायदा होणे गृहीत धरता येणार नाही का?

९) विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांनी कर्नाटकमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करत मतदारांची नावे वगळली जातात याबाबत खुलासा केला होता. त्यांनतर घाईघाईत पत्रकार परिषद घेऊन 'असे काही होऊच शकत नाही' वगैरे बचाव करण्याचा प्रयत्न झाला. मात्र या आरोपांना आठवडा होईपर्यंत निवडणूक आयोगाने नावे वगळण्यासाठीच्या तांत्रिक मागार्चा दुरुपयोग टाळण्यासाठी 'इ साइन' फीचर आणण्याचे म्हटले. याचा अर्थ आधी नावे वगळण्याकरता गैरमागार्चा वापर झालेला असू शकतो ना? म्हणजे ही प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित नव्हती असा नाही का?

१०) २०२३ च्या नियमानुसार 'बूथ लेव्हल एजंट' हा त्या इलेक्टोरल रोल / मतदान क्षेत्रामधील / बूथवरील असण्यासंबंधी नियम होता. पण निवडणूक आयोगाने नियम बदलला. जर त्या इलेक्टोरल रोलमधला एजंट मिळाला नाही तर त्या विधानसभा क्षेत्रातील इतर कोणताही बीएलए नियुक्त करता येईल. अचानक हे का केले असेल? कारण तामिळनाडू, बंगालमध्ये अनेक बूथवर बीएलए नाहीत ही आपल्या पसंतीच्या पक्षाची अडचण लक्षात आली का ? आणि इतर ठिकाणाहून नेमणुकीचा मार्ग उघडण्यात आला का ?

११) निवडणूक असलेल्या इतर राज्यांमध्ये 'एसआयआर' होणार आहे; पण आसाममध्ये नाही. आसाममध्ये 'एसआर' होणार आहे. म्हणजे 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' न होता फक्त 'स्पेशल रिव्हिजन'. का? याचं उत्तर देत ज्ञानेश गुप्ता म्हणाले 'आसाममध्ये एनआरसी' झालं आहे म्हणून. पण 'एनआरसी'चं काम निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत आहे की संघराज्य सरकारच्या? आसाममधल्या एनआरसीमध्ये अंदाजे २० लाख नावं वगळली आहेत आणि हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मग एसआयआर किंवा एसआर म्हणजे एका अर्थी 'एनआरसी'चंच काम सुरु आहे का? आणि त्याचा निवडणूक आयोगाशी काय संबंध?

१२) मतदार याद्यांमधील बांगलादेशी, नेपाळ आणि म्यानमारचे घुसखोर काढून टाकणे हा 'एसआयआर' म्हणजे मतदारयाद्यांचे पुनर्परीक्षण करण्याचा उद्देश आहे असे सांगितले गेले होते. पण अनेकांनी प्रश्न विचारूनदेखील घुसखोरांसंबंधी कोणतीही आकडेवारी आणि पुरावे दिले गेले नाहीत. याचा अर्थ तसे पुरावेच मिळाले नसणार असा होत नाही का ?

१३) दुबार मतदार, परदेशी महिला मतदार यादीमध्ये असणे, अनेक जिवंत व्यक्ती मतदार यादीतून गायब होणे, मृत व्यक्ती मतदार यादीमध्ये असणे, इतरांच्या तक्रारीने मतदारांची नावे कापली जाणे, एकाच घरामध्ये अक्षरशः शेकडो मतदार असणे, अयोग्य नावाचे मतदार, अयोग्य फोटोचे मतदार, चुकीच्या पत्त्यावर मतदार नोंदणी, सत्ताधारी पक्षाच्या अनेक नेत्यांनी विविध राज्यांमध्ये जाऊन मतदान करणे व तसे स्वतः जाहीर करणे, एकाहून अधिक एपिक आयडी असलेले मतदार सापडणे, उपहारगृहाच्या पत्त्यावर अनेक मतदारांची नोंदणी असणे, यासारखे अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवून 'निवडणूक आयोग व निवडणूक प्रक्रियेवर डोळे झाकून विश्वास ठेवा' असे सांगणे हे लोकशाहीसाठी धोकादायक नाही का ?

१४) महाराष्ट्रातील मरकडवाडी येथील नागरिकांना मतदानावर शंका होती. शंका निरसन करण्यासाठी त्यांनी मतदान घेण्याचे ठरवले. हा प्रयोग चिरडून टाकण्यासाठी आकाशपाताळ केले गेल्याचे आपणपाहिले आहे. नक्की कशाची भीती होती?

१५) 'एसआयआर'च्या प्रेशर मुळे २५ हुन अधिक बूथ लेव्हल ऑफिसर्सचा (बीएलओ) मृत्यू झाला आहे. यातील काहींनी आत्महत्या केल्याचे आढळून आले आहे. हा दबाव व भीती नक्की काय साध्य करण्यासाठी?

क्रमशः.




(लेखक, व्यवसायांना धोरण सल्ला देतात.
thewisecompass@gmail.com)

## रोटरॅक्ट क्लब ऑफ सामर्थ्य सोलापूरतर्फे चित्रकला स्पर्धा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** रोटरॅक्ट क्लब ऑफ सामर्थ्य सोलापूर यांच्या वतीने दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी रोटरी नॉर्थ राधाकिसन फोमरा मुखबधिर विद्यालय, सोलापूर येथे चित्रकला स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत शाळेतील ५० मुखबधिर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेचा व कलागुणांचा प्रभावी आविष्कार सादर केला.




या कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम अध्यक्ष रोट्रॅ. बसवराज कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी रोट्रॅ. निखिल ताटे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना योग्य वातावरण, साहित्य व मार्गदर्शन मिळावे यासाठी त्यांनी काटेकोर नियोजन केले.

कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे मॅडम व सहशिक्षिका रेणुका पसपुले मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत स्पर्धेत मनमोकळेपणाने सहभागी होण्यासाठी प्रेरित केले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कलाकार व लेखक ऋत्विज चव्हाण उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या चित्रांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक केले. ‘भाषेच्या मयार्दा असूनही कला ही भावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे,’ असे मत व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमामुळे मुखबधिर विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली असून त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, या उद्देशाने रोटरॅक्ट क्लब ऑफ सामर्थ्य सोलापूर राबवत असलेले असे उपक्रम कौतुकास्पद असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## वात्रटिका

### महाराष्ट्र सध(द)न

सधन मनाची माणसं
असली की मुक्त होते सदन...
विश्वासाला सुरूंग लागतो
मग करावे त्यांनाच वंदन...
निर्दोष होते कोणी तर मग
कारावास का भोगला...
निर्दोष असणाऱ्यानीच किती
किती अन्याय सोसला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

पान १ वरून

## सोलापूर भाजपात सत्तासंघर्ष...

हीच परंपरा पुढे चालवायची असल्याचे बोलले जात असून, त्यांच्या गटाचे ४१ नगरसेवक असल्याने 'आम्ही सांगू तोच महापौर' असा दावा कोठे समर्थकांकडून केला जात आहे. दुसरीकडे, देशमुख गटाने मात्र सर्व नगरसेवकांचे मत विचारात घेऊनच उमेदवार ठरवा, अशी ठाम भूमिका घेतली आहे. पक्षाने घराणेशाहीला विरोध दर्शविल्यास बिज्जू प्रधाने, अनंत जाधव, नरेंद्र काळे, रंजिता चाकोते यांच्याही नावांचा विचार होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर भाजप नेतृत्व कोणाची बाजू घेणार, महापौरपदासाठी तडजोड होणार की संघर्ष तीव्र होणार, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे. महापौर निवडीचा निर्णय भाजपच्या वरिष्ठ पातळीवरून होण्याची शक्यता असून, पुढील काही दिवसांत या रस्सीखेचीचे चित्र स्पष्ट होण्याची चिन्हे आहेत.

## क्रिडाई कोल्हापूरतर्फे 'दालन २०२६' वास्तू-बांधकाम प्रदर्शनाचे आयोजन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** क्रिडाई कोल्हापूरतर्फे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे वास्तू व बांधकाम विषयक प्रदर्शन 'दालन २०२६' येत्या ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत महालक्ष्मी दरबार हॉल ग्राउंड, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संदीप बोरचाटे यांनी पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री व पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमास खासदार छत्रपती शाहू महाराज, वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्यक मंत्री हसन मुश्रीफ आमदार, मंत्री, प्रशासकीय अधिकारी व क्रिडाईचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या प्रदर्शनाचे हे १३ वे वर्ष असून यंदा १७० हून अधिक स्टॉल्स सहभागी होत आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील नामांकित बांधकाम व्यावसायिक, साहित्य उत्पादक व सेवा पुरवठादार या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत.

प्रदर्शनाच्या काळात विविध तांत्रिक सेमिनार्स आयोजित करण्यात आले आहेत. रविवार दि. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता विद्यार्थ्यांसाठी प्रा. एम. जी. गाडगीळ (मुंबई) यांचे व्याख्यान होणार आहे.

१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता अभ्युदय गोडबोले (केमिकल इंजिनिअर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सोमवार दि. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता समारोप कार्यक्रम जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते आणि इतर अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. ग्राहकांना एका छताखाली नवीन गृहप्रकल्प, बांधकाम तंत्रज्ञान, गृहकर्ज, इंटिरिअर, सोलर सिस्टिम, एलिव्हेटर, टाइल्स आदींची माहिती मिळणार असून घर खरेदीसाठी योग्य संधी उपलब्ध होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस क्रिडाई कोल्हापूरचे पदाधिकारी सुनील चिले, मौक्तिक पाटील, अक्षय जव्हेरी यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# निवडणूक प्रचार साहित्याचे प्रमाणीकरण आवश्यक : जिल्हाधिकारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत 11 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरूवात झाली आहे. या निवडणुकीत सहभागी होणाऱ्या सर्व उमेदवारांनी प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी त्या जाहिरातींचे प्रमाणीकरण जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले आहे.

**अधिसूचना व नियम**

महाराष्ट्र शासनाच्या 9 ऑक्टोबर 2025 रोजीच्या अधिसूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदभार्तील सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे.

यामध्ये खालील माध्यमांचा समावेश आहे :

- दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या
- यूट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क
- आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या
- चित्रपटगृहातील जाहिराती
- सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडिओ-व्हिज्युअल डिस्प्ले)
- ई-वृत्तपत्रे
- बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस
- समाजमाध्यमे (सोशल मीडिया)
- संकेतस्थळे

**समितीची रचना**

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीची दिनांक 17 जानेवारी 2026 रोजी स्थापना करण्यात आली आहे.

- पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी
- उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख
- संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी
- संबंधित तहसीलदार

हे सदस्य म्हणून तर जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहतील.

**अर्ज प्रक्रिया**

प्रस्तावित जाहिरात प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

- अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत जोडावी.
- राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे.
- अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेसोबत उपलब्ध आहे. तसेच जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणान व संनियंत्रण समिती, जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे उपलब्ध होईल.

**आवाहन :** जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, उमेदवारांनी जाहिरातींचे प्रमाणीकरण करूनच प्रचार करावा. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि आचारसंहितेचे पालन करण्यासाठी ही प्रक्रिया अत्यावश्यक आहे.

# सोलापूरमध्ये प्रथमच TEDx Talk नवविचारांचा जागतिक मंच

## एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा उपक्रम

TEDx Sinhgad COE
x = independently organized TED event

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अभियांत्रिकी शिक्षणाच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव (सोलापूर) येथे पहिल्यांदाच TEDxSinhgad COE 2026 या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या TEDx Talk चे आयोजन करण्यात आले असल्याचे सिंहगडचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी सांगितले.

हा प्रेरणादायी कार्यक्रम शनिवार, 31 जानेवारी 2026 रोजी सकाळी 9 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत होणार असून सोलापूर शहरात प्रथमच TEDx संकल्पनेअंतर्गत असा भव्य उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसाठी विचारविश्व उलगडणारा प्रेरणादायी मंच राहणार आहे.

जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या TED (Technology, Entertainment, Design) या संकल्पनेअंतर्गत आयोजित या कार्यक्रमाची यंदाची संकल्पना 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगातील शिक्षण - विचार व कौशल्यांची जडणघडण' अशी आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नवविचार, सर्जनशीलता, तंत्रज्ञानाची जाण आणि भविष्याभिमुख दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या TEDx Talk मध्ये प्रभावशाली वक्ते आणि तज्ज्ञ मान्यवर विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत. यामध्ये कॉर्पोरेट ट्रेनर डॉ. अर्शद सय्यद, इन्फ्लुएंसर मंदार पाडवळ, लेखक अतुल कहाते, उद्योजिका ऐश्वर्या यादव आणि उद्योजक मुदस्सर अली रंगरेज यांचा समावेश आहे. शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), तंत्रज्ञान, नवोन्मेष, उद्योजकता आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर प्रेरणादायी संवाद होणार आहे.

दिवसभर चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध सत्रे, सांस्कृतिक सादरीकरणे, ओपन पॅनल डिस्कशन तसेच विद्यार्थ्यांशी थेट संवाद यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सर्जनशील विचारसरणी आणि जागतिक व्यासपीठाशी जोडण्याची संधी मिळणार असल्याने हा उपक्रम संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीतील एक ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.

हा कार्यक्रम विद्यार्थी, कर्मचारी, व्यावसायिक व सर्वांसाठी सशुल्क खुला असणार आहे. यामध्ये पास, प्रमाणपत्र, ओळखपत्र व जेवणाची सोय करण्यात आली आहे. इच्छुकांनी सहभागासाठी अधिक माहितीसाठी डॉ. प्रदीप तपकिरे (मो. 9767890517), अर्शद सय्यद व जीवनकुमार तोळणुरे (मो. 9822342644) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# चोपडी जिल्हा परिषद गटातील सर्व गावांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय : चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** चोपडी जिल्हा परिषद गटातून सर्वसाधारण जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी चोपडी गटाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प जाहीर केला आहे. 'विकास हा केवळ घोषणांपुरता मर्यादित न राहता तो प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे. चोपडी जिल्हा परिषद गटाचा सर्वांगीण विकास हेच माझे एकमेव ध्येय आहे,' असे त्यांनी ठामपणे सांगितले.



चोपडी जिल्हा परिषद गटाचे भाजप शिवसेना आरपीआय महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी नाझरे येथील दत्तानंद स्वामी समाधी दत्त मंदिर, श्री बाळब्रह्मचारी योगी समर्थ सद्गुरू संजीवा स्वामी महाराज समाधी, श्री अंबिका मंदिर, श्री विठ्ठल मंदिर, श्री हनुमान मंदिर, श्री गणेश मंदिर, श्री महादेव मंदिर, दर्गा या ठिकाणी मनोभावे दर्शन घेऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी नाझरे गावातून पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह मतदार, नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

यावेळी महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत मतदारांशी संवाद साधताना म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोपडी जिल्हा परिषद गटात रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण यांसह सर्व मूलभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली विकासकामे मार्गी लावून गावागावात पायाभूत सुविधांचे जाळे मजबूत करण्याचा निर्धार महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केला. शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

महायुतीच्या माध्यमातून विकासाभिमुख आणि स्थिर नेतृत्व देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चोपडी जिल्हा परिषद गटात शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवण्यात येणार असून, त्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष यंत्रणा उभारली जाईल. पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय, दर्जेदार रस्ते, अखंड वीजपुरवठा, आरोग्य सुविधा बळकट करणे, तसेच शैक्षणिक सोयीसुविधा वाढवणे या मुद्द्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

शासनाच्या सर्व लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे, पारदर्शक पद्धतीने आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे. शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिक यांच्या अडचणी समजून घेऊन त्या तातडीने सोडवण्यासाठी लोकसहभागातून विकासाचे मॉडेल राबवले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. 'चोपडी जिल्हा परिषद गटाचा विकास करून लोकांच्या विश्वासावर खरे उतरून पारदर्शक, गतिमान आणि विकासाभिमुख कारभार देण्याचा प्रयत्न राहील,' असे ठाम मत व्यक्त करत महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी मतदारांशी थेट संवाद साधून त्यांचे प्रश्न समजून घेतले.

यावेळी चोपडी जिल्हा परिषद गटाचे भाजपचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत, चोपडी पंचायत समितीचे उमेदवार अजय सरगर, राजुरी पंचायत समितीचे उमेदवार सदाशिव दबडे यांच्यासह सुरेश (काका) चौगुले, संजय शेळके, मंगेश रायचुरे, हणमंत गोसावी, विनायक सरगर, भालचंद्र भंडारे, दीपक बनसोडे, अक्षय सरगर, भारत चव्हाण, जालिंदर सरगर, भारत शेळके, दादा ननवरे, अमोल तेली, ज्ञानेश्वर सरगर, भाऊ पाटील, आनंदा बनसोडे, माऊली बनसोडे, संतोष घोडके, नागेश भंडारे, अण्णा पाटील, उपसरपंच बंडू केदार, संभाजी चव्हाण, बाळासाहेब केदार, मुकुंद पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. विजय कंदेवाड यांची विशेष मुलाखत

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** मुंबई, दि. २३ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' या दूरदर्शनवरील कार्यक्रमात आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड यांची 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष जनजागृती मोहिमेवर आधारित विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात ही मुलाखत दोन भागांमध्ये प्रसारित होणार असून पहिला भाग मंगळवार, २७ जानेवारी २०२६ रोजी तर दुसरा भाग मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रक्षेपित होणार आहे. तसेच ही मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही उपलब्ध राहणार आहे. मुलाखत निवेदिका उन्नती जगदाळे यांनी घेतली आहे.

आरोग्य विभागामार्फत 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष जनजागृती मोहीम ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत राज्यभर राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून सिकलसेल ॲनिमियाचा प्रतिबंध, लवकर तपासणी व प्रभावी उपचार याबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात आला आहे. सिकलसेल ॲनिमिया हा अनुवांशिक रक्तविकार असून त्याचा प्रादुर्भाव प्रामुख्याने आदिवासी व दुर्गम भागांमध्ये अधिक प्रमाणात आढळून येतो.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# मार्कंडेय प्रशालेत हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मार्कंडेय हायस्कूल विडी घरकुल, कुंभारी येथे मकरसंक्रांती निमित्त माता पालकांसाठी आयोजित करण्यात आलेला हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक अमोघसिद्ध कुंभार होते तर जि. प. पुनर्वसन विभाग तहसीलदार सरस्वती पाटील, म्हेत्रे प्रशालेच्या मुख्याध्यापिका नीलिमा भांगे व बत्तुल शाळेच्या मुख्याध्यापिका चैताली जगदार यांची प्रमुख



उपस्थिती होती. प्रारंभी सरस्वती मातेच्या व महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. उपस्थितांचे स्वागत व सत्कार पर्यवेक्षिका सुमन बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सहशिक्षिका ऐश्वर्या कटारे यांनी प्रास्ताविकेतून हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले.

यावेळी बोलताना तहसीलदार पाटील म्हणाल्या,शिक्षण हा समाज विकासाचा पाया असून महिला ही समाज घडवणारी आदिशक्ती आहे. शिक्षण प्रवाहात महिलांची भूमिका फार महत्त्वाचे असल्याचे सांगून प्रशालेने आयोजित केलेल्या या हळदी कुंकवामुळे माता-पालकांचे प्रशालेशी असलेले स्नेहाचे नाते अधिक दृढ होणार असल्याचे सांगितले. पाहुण्यांचा परिचय सहशिक्षिका वैशाली डांगे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अश्विनी पडनूरकर यांनी केले. शेवटी उपस्थित सर्व महिलांना तिळगुळ आणि संक्रातीचे वाण देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमास माता पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# नरखेड येथे निरामय क्लिनिक चे उद्घाटन

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** नरखेड आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी डॉ. राधा पाटील -मिरगणे यांच्या निरामय क्लीनिकचे उद्घाटन मोहोळ तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.शैलेश झाडबुके यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

ग्रामीण भागातील नागरिक बऱ्याचदा आजार अंगावर काढण्याचा प्रयत्न करतात,खास करून स्त्रियांना त्यांचे आजारपण खुलेपणाने मांडण्यासाठी महिला डॉक्टरांची आवश्यकता असते आणि ती सोय डॉ. राधा पाटील- मिरगणे यांनी उपलब्ध करून सेवा देण्याचा जो निर्णय घेतला त्याचे डॉ. शैलेश झाडबुके यांनी कौतुक केले.

यावेळी डॉ. प्रमोद पाटील म्हणाले की अनेक वेळा रुग्ण त्यांचे आजारपण जास्त वाढल्यानंतर डॉक्टरांकडे येतात आणि दुर्दैवाने पेशंटची तब्येत जास्तच बिघडली की त्याचे आरोप डॉक्टर वरती केले जातात तसे न करता वेळीच उपचार करून घेणे आवश्यक असते. डॉक्टर सुद्धा माणूसच असतो त्याच्याशी वाद घालणे किंवा दवाखान्याची तोडफोड



करणे गैर असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.मिलिंद लामगुंडे, डॉ. उमेश मेंडगुळे, डॉ. अमोल पाटील, डॉ. शुभम चौधरी, डॉ. सुबोध जोशी यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटन प्रसंगी नरखेड आणि परिसरातील अनेक मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते विनायकराव पाटील (बार्शी), तानाजीराव दळवी (यावली), विक्रमराव देशमुख (परळी वैद्यनाथ), किशोर इंगळे सर (वैराग), रघुनाथ मिरगणे, रमेश मिरगणे, ओंकार मिरगणे (केवड), विश्वनाथराव देशमुख (तेरढोकी), मल्लिकार्जुन क्षीरसागर (मुंगशी), नजीर शेख (मोहोळ) आदी मान्यवर उपस्थित होते नरखेड मधील ग्रामस्थांमध्ये तंटामुक्तीचे अध्यक्ष उत्तम मोटे, कोल्हाळ सर, जयवंत पाटील सर, दिलीप पाटील, राजू पाटील, माजी सरपंच विनोद पाटील, प्रदीप पाटील आदी उपस्थित होते.

उद्घाटन समारंभ पार पाडण्यासाठी प्रकाश पाटील सर, ओंकार पाटील, सुधीर पाटील, श्रीकांत पाटील विलास पाटील, अविनाश पाटील, आणि जहिरुद्दीन पठाण सर यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश नरगीडे यांनी केले.आणि आभार प्रा. शिवराज पाटील यांनी मानले.


**VNP MOTORS**
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
**OFFER**
पेट्रोल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL — HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
Trusted & Approved for Leading Brands
**VNP MOTORS Pvt. Ltd.**
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007
GOVT. APPROVED CNG RETROFITTMENT CENTER & WORKSHOP

# माघ यात्रा; पंढरपूर शहर व वाखरीत मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** माघ शुध्द एकादशी 29 जानेवारी 2026 रोजी असून, माघ यात्रा कालावधी दि. 23 जानेवारी ते 01 फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. दिनांक 28 ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत पंढरपूर शहरात तसेच वाखरी परिसरात दिनांक 27 ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी इथापे यांनी पंढरपूर शहरातील तसेच वाखरी परिसरात मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण ४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे ८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी १०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** १४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत) १९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे २५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी २७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव ३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया ३२) किमानच्या विरूध्दार्थी ३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको ४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट ४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष ४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच ५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 160

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | | | | | 1 | | |
| | | | | | 2 | 3 | | |
| 1 | | | | 5 | | | | 4 |
| 9 | 8 | | 1 | | 5 | | 7 | 2 |
| 2 | 5 | 7 | 9 | | | | 3 | 1 |
| 6 | 1 | 3 | 7 | 2 | 8 | | 4 | |
| 4 | 2 | | 5 | | 1 | | | 3 |
| | 7 | 8 | | | 9 | | | 5 |
| | 6 | | 4 | | | | | |

# विमलताई खताळ यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा सावळेश्वर गणाचा निर्धार

## लांबोटी येथे भाजपा ची बैठक संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्व. तानाजीराजे खताळ यांनी कामती जिल्हा परिषद गटाचे प्रतिनिधित्व करताना या गटातील पायाभूत मूलभूत सुविधांबरोबर, आरोग्य, शिक्षण, वीज, रस्ते, पाणी अशा विविध योजनांची कामे केली आहेत. त्यांच्या या सामाजिक कायार्चा वसा आणि वारसा पुढे चालवण्यासाठी त्यांच्या पत्नी विमलताई तानाजीराजे खताळ यांना कामती जिल्हा परिषद गटातून पालकमंत्री जयकुमार गोरे, आपले कुटुंबप्रमुख राजन पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण युवानेते बाळराजे पाटील, अजिंक्यांराणा पाटील यांनी मोठी संधी दिली आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीचे



कमळ आपल्या कामती गटात मोठ्या मताधिक्याने फुलवायचे असल्याने सावळेश्वर गणातून त्यांना सर्वाधिक मताधिक्य दिलेच पाहिजे असा निर्धार सावळेश्वर गणातील प्रत्येक कार्यकर्त्यांनी करून जोशाने कामाला लागलेच पाहिजे असे आवाहन जिल्हा दूध संघाचे माजी संचालक सज्जन पाटील यांनी केले.

लांबोटी (ता. मोहोळ) येथे कामती गटातील सावळेश्वर गणातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी



पुढे बोलताना ते म्हणाले की तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार राजन पाटील यांनी मोहोळ तालुक्यामध्ये केलेला मोठा विकास त्या विकासाच्या जोरावर भारतीय जनता पार्टीच्या ताकतीने या गटातील उर्वरित विकास करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून विमलताई खताळ यांना विजयी करा. त्यांचा विजय हीच स्व. तानाजीराजे यांना खरी श्रद्धांजली असेल असेही ते शेवटी म्हणाले.

या वेळी मोहोळ तालुका कृउबा समितीचे सभापती धनाजी गावडे, लोकनेते शुगरचे संचालक शुक्राचार्य हावळे, युवा नेते अक्षय खताळ, भीमराव चंदनशिवे, नामदेव गोफणे, प्रदीप आमले, सरपंच सुनील मिरजे, अनिरुद्ध खताळ, धर्मा शिंदे, प्रभाकर होनमाने, बाळासाहेब बंडगर यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कामती जिल्हा परिषद गटामध्ये सार्वजनिक जीवनात काम करीत असताना स्व. तानाजीराजे खताळ यांनी नेहमीच सामाजिक सलखा जपलेला आहे. आमचे सर्वेसर्वा माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील व सिनेट सदस्य अजिंक्यराण पाटील यांनी मोहोळ तालुक्यामध्ये युवकांची एक मजबूत फळी निर्माण केली आहे. त्या युवकांच्या ताकदीवर आपण विमलताई तानाजीराजे खताळ यांना सावळेश्वर या गणातून मोठे मताधिक्य दिले जाईल.

**- शुक्राचार्य हावळे,**
संचालक लोकनेते शुगर

# नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी सोलापूरमध्ये रस्ता सुरक्षा रॅली संपन्न



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र व राज्य शासनाच्या निदेर्शानुसार दरवर्षीप्रमाणे यंदाही रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत असून, नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने सीट बेल्ट व हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले.

प्रादेशिक परिवहन कार्यालय येथून दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.१५ वाजता या रॅलीस प्रारंभ झाला. सदर रॅलीचे उद्घाटन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी असिफ मुल्लाणी यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे वाहतूक नियमांबाबत जनजागृती होऊन जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

रॅलीचा मार्ग प्रादेशिक परिवहन कार्यालय, कंबर तलाव, सात रस्ता, रेल्वे स्टेशन, भैय्या चौक, रामलाल चौक, पार्क चौक, डफरीन चौक, रंगभवन, सात रस्ता, गांधी नगर, होटगी रोड, आसरा चौक, डी-मार्ट, दावत चौक, भारती विद्यापीठ मार्गे पुन्हा प्रादेशिक परिवहन कार्यालय असा होता.

या रॅलीमध्ये परिवहन विभागाचे अधिकारी व कर्मचारी, वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी, ड्रायव्हिंग स्कूलचे प्रतिनिधी तसेच बाईकर्स ग्रुप सोलापूरचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नागरिकांनी वाहन चालवताना नेहमी हेल्मेटचा व सीट बेल्टचा वापर करावा, वेगमयार्दा आणि वाहतूक नियमांचे पालन करावे असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे.

# 'एकदाच संधी द्या, पाच वर्षे तुमचा सालगडी म्हणून काम करेन'- चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** ह्मला एकदाच संधी द्या. पुढील पाच वर्षे मी तुमचा सालगडी म्हणून प्रामाणिकपणे काम करेन,ह्व असे भावनिक आवाहन भाजप-शिवसेना-आरपीआय महायुतीचे चोपडी जिल्हा परिषद गटाचे अधिकृत उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी केले. चोपडी जिल्हा परिषद गटातील कारंडेवाडी (बुद्धेहाळ), सोमेवाडी, कारंडेवाडी (उदनवाडी) येथील गावभेट दौऱ्यात बोलताना त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली.

राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार असून आजवर सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका केवळ भाजपनेच घेतली असल्याचे चोपडी जिल्हा परिषद गटाचे महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी स्पष्ट केले. जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांच्याकडे ग्रामविकास मंत्रालयाचा कारभार असल्यामुळे गावपातळीवरील रस्ते, पाणी, वीज, स्मशानभूमी यांसह सर्व मूलभूत समस्यांवर निश्चितपणे तोडगा काढला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'मी आश्वासन देणारा नेता नाही, तर जनतेच्या अडीअडचणी, समस्या प्रत्यक्ष सोडवून काम करणारा एक कार्यकर्ता आहे. गावागावातील प्रश्न माझ्यासाठी राजकारण नसून जबाबदारी आहे,' असे सांगत त्यांनी विकासापासून वंचित राहिलेल्या प्रत्येक गावाचा सवार्गीण विकास करण्याचा निर्धार व्यक्त केला.



जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपची सत्ता येणार असून जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा भाजपचाच होणार, यात कोणतीही शंका नाही. त्यामुळे कमळाला दिलेले एकही मत वाया जाणार नाही. भाजपच्या माध्यमातून चोपडी जिल्हा परिषद गटाचा सर्वांगीण विकास साधला जाईल. 'मला मतरूपी जनतेचे आशीर्वाद द्या. मला एकदाच संधी दिलीत, तर या गावासह संपूर्ण चोपडी जिल्हा परिषद गटाचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही,' असे ठाम आश्वासन चेतनसिंह केदार सावंत यांनी उपस्थित नागरिकांना दिले.

चोपडी जिल्हा परिषद गटाचे भाजप शिवसेना आरपीआयचे अधिकृत उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी कारंडेवाडी (बुद्धेहाळ), सोमेवाडी, कारंडेवाडी (उदनवाडी) येथील गावभेट दौऱ्यात गावातील समस्या, अडचणी जाणून घेतल्या. यावेळी भाजपचे मंडल अध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, चोपडी गावचे उपसरपंच पोपटशेठ यादव, सुभाष गोडसे, सोमेवाडी येथील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते नारायण गळवे, माजी उपसरपंच भारत गोडसे, चंदू चौगुले, सुखदेव करांडे, मुक्ताआप्पा करांडे, सुमित करांडे, सत्यवान गाडे, बाबू करांडे, बजरंग करांडे, सुशांत करांडे, लक्ष्मण करांडे, बाळू टोणे, सुरेश करांडे, वसंत करांडे, सुरेश काका चौगुले, संजय शेळके, माऊली बनसोडे, सुधीर खांडेकर, केशव काळेल, हणमंत विटेकर, अजित काळेल, औदुंबर गोडसे, विठ्ठल बंदवडे, सिद्धेश्वर शेळके, अशोक ठोंबरे, तात्या खोकले ,राजू गेनुरे, अशोक शेळके, राजू शेळके, गुंडा ठोंबरे, महादेव चौगुले, अशोक वाघमारे, सिद्धेश्वर बंदवडे, बाळू खोकले, अभि शेळके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या गावभेट दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'सेवकभावनेने काम करणारा उमेदवार' अशी भावना मतदारांमध्ये दिसून येत असून प्रचाराला दिवसेंदिवस चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

# 'मनोरमा शब्दगंध 2025' या स्मरणिकेचे डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते प्रकाशन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मनोरमा राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या वैचारिक, सृजनशील आणि संवादमय प्रवासाची साक्ष देणारी 'मनोरमा शब्दगंध 2025' या स्मरणिकेचे प्रकाशन

98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते सांगली येथे करण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या समारंभाचे आयोजन केले होते.

यावेळी सांगलीचे जिल्हाधिकारी अशोकराव काकडे, त्यांच्या सुविद्य पत्नी शरदिनी काकडे, ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे, मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, पत्रकार संदीप काळे, सारिका काळे, आभाळमाया फाउंडेशनचे प्रमोद चौगुले ,डॉ. ऋचा पाटील, डॉ. सुमित मोरे, डॉ. मिताली मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे होते. यावेळी सांगलीतील ज्येष्ठ साहित्यिक उपस्थित होते.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे मनोरमा संमेलनास प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकलेल्या डॉ. तारा भवाळकर यांचा साहित्यविश्वातील दीर्घकालीन योगदानाबद्दल याच कार्यक्रमात गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी साहित्य हे



समाजाचे आत्मभान जागृत करणारे माध्यम असल्याचे सांगत, भवाळकर यांच्या लेखनाने मराठी साहित्यात विचार, संवेदना आणि मूल्यांची रुजवण केल्याचे नमूद केले. डॉ. तारा भवाळकर यांनी या स्मरणिकेचे कौतुक केले. याप्रसंगी साहित्यिक श्रीकांत मोरे यांची मुलाखतही घेण्यात आली.

मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्मरणिका साकारली असून, संकल्पना महासागर मीडिया ग्रुपचे समूह संपादक संदीप काळे यांची आहे. स्मरणिकेचे संपादन श्रीकांत मोरे व शोभा मोरे यांनी केले आहे.25 डिसेंबर रोजी सोलापूरच्या पंचतारांकित हॉटेल बालाजी सरोवर येथे दिवसभर चाललेल्या साहित्य संमेलनातील विविध सत्रे, परिसंवाद, काव्यसंमेलन, मुलाखती व साहित्यिक सन्मान यांचा सविस्तर आलेख या स्मरणिकेत मांडण्यात आला आहे.

### क्यूआर कोडद्वारे स्मरणिकेचा डिजिटल अनुभव संपूर्ण वाचनीय अशी ही स्मरणिका

क्यूआर कोडच्या माध्यमातून ही स्मरणिका डिजिटल स्वरूपातही उपलब्ध होणार असून, नव्या पिढीपर्यंत साहित्य पोहोचवण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न ठरत आहे, असे शोभा मोरे यांनी स्पष्ट केले आहे.

### 'मनोरमा शब्दगंध 2025'ची वैशिष्ट्ये

सकाळी 10 ते रात्री 10 या कालावधीत झालेल्या संमेलनातील सर्व प्रमुख सत्रांचा सविस्तर आढावा. विश्वास पाटील, रामदास फुटाणे यांच्यासह ज्येष्ठ साहित्यिकांच्या मुलाखती, काव्यसंमेलन व परिसंवाद. अध्यक्षीय भाषण, स्वागताध्यक्षांचे मनोगत व संमेलनाची भूमिका. श्रीकांत मोरे यांच्या निवडक साहित्यकृती, कविता, चारोळ्या व प्रस्तावना. सोलापूरची साहित्यपरंपरा, साहित्य संमेलनाची गरज व समकालीन साहित्यप्रवाहांचा वेध ही स्मरणिका केवळ आठवणींचा संग्रह नसून, मराठी साहित्याच्या जिवंत प्रवाहाचे दस्तऐवजीकरण ठरत आहे.

# नेताजी प्राथमिक शाळेत नेताजी जयंती साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळेत आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस यांची १२९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष संतोष पुजारी व माता पालक संघाच्या सदस्या भाग्यश्री बंदलगी आदी उपस्थित होते.

प्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर समर्थ आलुरे, आदित्य बंबाटक्के, राधिका सावळे, समृद्धी पटणे, रिषिता मासपत्री, अस्मिता पुट्ठा, रितिका हलकुडे, त्रिशा साका, श्रेया लांडगे, कृतिका सुतार, अक्षरा पसूल, सानवी म्हेत्रे,स्वरा आडम, श्रेया काटमोरे, धनश्री कलशेट्टी, अक्षर वड्डेपल्ली आदी विद्यार्थ्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवन कार्या विषयी माहिती सांगितले.यावेळी क्रीडा स्पधेर्तील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. यावेळी विजयालक्ष्मी कुंभार म्हणाले, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. देशासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांचे नाव आपल्या शाळेला आहे. हि बाब आपल्यासाठी गौरवास्पद आहे. त्यांचे कार्य आपल्यासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक जगदेव गवसने यांनी केले तर प्रशांत बत्तुल यांनी आभार मानले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत निवडून यायची कुवत नाही त्यांनी बोलू नये - आ अभिजीत पाटील

**पंढरपुर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत माझी लढाई स्थानिक नेतेशी आहे भाजपशी नाही असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा शुभारंभ मेंढापूर येथील दुध्देश्वर मंदिर येथे करण्यात आला. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण, जिल्हाध्यक्ष वषार्राणी शिंदे, महिला जिल्हाध्यक्ष पल्लवी पाटील, ॲड. दिपक पवार यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार अभिजीत पाटील म्हणाले की, ही निवडणूक जिल्हा परिषद पंचायत समितीची असताना विरोधी गटातील नेते विठ्ठल कारखान्यावर बोलत आहेत. विठ्ठल कारखान्यातील सभासदांचा माझ्यावर विश्वास आहे यामुळे विठ्ठल कारखाना निवडणूक व माढा विधानसभा निवडणुकीत मला यश मिळाले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक स्थानिक नेत्याविरुद्ध लढत आहे. मात्र हे नेते माझी लढाई भाजपची असल्याचा अपप्रचार करत आहेत. माझी लढाई भाजपशी नाही तर स्थानिक नेत्यांची असल्याचे आमदार अभिजीत पाटील म्हणाले.

मी घराणेशाहीला फाटा देत, शिंदे परिवाराचा ३० वषार्ची सत्ता उलथून टाकली व मायबाप जनतेने मला मतदानरुपी आशीर्वाद देऊन काम करण्याची



संधी दिली व मी आमदार झालो. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आहेत. ज्यांनी चारी दिशांनी चार पक्ष बदलले विधानपरिषद व विधानसभेला पडले, सभासदांच्या मालकीचा कारखाना विकला, एक टक्केवारीवर भाड्याने दिला ते मला ऊसदरावर बोलत आहेत. निवडणुकीमध्ये देखील माझ्या घरातील एकही उमेदवार या निवडणुकीमध्ये उभा केला नाही. समोरच्या बाजूला घराणेशाहीलाच पुढे करून उमेदवारी दिली आहे याचा मतदारांनी ओळखायला हवे.

रणजीत शिंदे यांना माझे खोले आव्हान आहे की, त्यांनी शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर द्यावा. पंढरपूर व माढा तालुक्यातील काही नेते स्वतःच्या स्वाथापीटी भाजपमध्ये गेले असून ते पालकमंत्र्यांना साड्या लावण्याचे काम करत आहेत काही राजकीय नेते सभेमधून मी चुकून आमदार झालो असे सांगत आहेत. मात्र मी तीस हजार मतांनी होऊन अधिक मताने विजयी झालो आहे. त्यामुळे त्यांनाच बोलण्यास कोणताही विषय नसल्यामुळे ते विठ्ठल कारखान्यावर व माझ्या वैयक्तिक टीका करत असल्याचे सांगितले. जिल्हा परिषद व पंचायत समितीची आहे. यामुळे निवडणुकीविषयी त्यांनी बोलावे विकासावर बोलावे असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी मतदारांना सोलापूर जिल्ह्याचा विकास करायचा असेल तर मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मागे खंबीरपणे उभे राहावे विरोधकांच्या भूलथापाला पडी बळी पडू नका असे आवाहन यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले.

# अकलूज येथे मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने माळशिरस तालुक्यातील पहिल्या टप्प्यातील २३०६ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा अकलूजच्या उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर यांचे मार्गदर्शनाखाली आज अकलूज येथे सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार सुरेश शेजुळ व नायब तहसीलदार अमोल कदम यांनी प्रशिक्षण दिले.

स्मृतीभवन, यशवंतनगर (अकलूज), (ता.माळशिरस) येथे आज शनिवार दि.२४ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

आजच्या पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणात सर्व कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या निदेर्शाप्रमाणे दृक श्राव्य पद्धतीने चलचित्रफितीद्वारे दोन सत्रात माहिती देण्यात आली. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुरेश शेजुळ व निवासी नायब तहसिलदार





अमोल कदम यांनी प्रशिक्षणार्थींना सखोल मार्गदर्शन केले.

मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व मतदान कर्मचाऱ्यांनी करावयाची कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे महर्षि प्रशाला, यशवंतनगर येथे ५० झोनल ऑफिसर व ग्राम महसूल अधिकारी यांनी मतदान कर्मचाऱ्यांना बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट या

मशिन हाताळणीचे(हॅन्डस ऑन) प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी कर्मचाऱ्यांचे गट करून २५ क्लास रूम पद्धतीने प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी संपूर्ण मतदान प्रक्रियेदरम्यान अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून आदर्श

आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी केले.

यावेळी निवासी नायब तहसिलदार अमोल कदम, माळशिरसच्या गटशिक्षणाधिकारी स्वरा महामुनी, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब रुपनवर, निवडणूक नायब तहसिलदार प्रवीण सुळ, महसूल तहसीलदार सिद्धनाथ जावीर, पुरवठा निरीक्षण अधिकारी रविकिरण शेटे, सहाय्यक महसूल अधिकारी अजित जाधव, चंद्रकांत भोसले, सर्व मंडल अधिकारी तसेच सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहाय्यक, महसूल सेवक यांसह इतर निवडणूक कर्मचारी उपस्थित होते.

या प्रशिक्षणावेळी मतदान अधिकारी व कर्मचारी यांना चहा, पुरी भाजी नाश्ताची सोय करण्यात आली होती.

# सूरत-चेन्नई महामार्गाच्या कामात अवैध ब्लास्टिंग

## अक्कलकोटमधील नागरिकांचे जीव धोक्यात

**अक्कलकोट,(कटूसत्य वृत्त):-** तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरालगत बासलेगाव रस्त्यावरील कोहिनूर मंगल कार्यालय जवळ सूरत ते चेन्नई महामागार्चे काम सुरू आहे. रस्ता बनविण्यासाठी संबंधित कंपनीकडून नियमबाह्य अवैधरित्या बोर गाडीच्या सहाय्याने सुरुंग लावून मोठ मोठे ब्लास्टींग केले जात आहे. या वाढत्या ब्लास्टींगमुळे येथील अनेक घरांना मोठे तडे गेले आहेत, तर अनेक घरांची पडझड होण्याची शक्यता आहे. आणि अनेक कुटुंबांच्या बोअरवेल मधील पाण्याची पातळी कमी झाली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून ब्लास्टींग सुरू असताना, अनेक मोटारसायकलस्वार बासलेगाव कडे जात असताना किंवा अक्कलकोट कडे येत असताना त्यांच्या बाजूलाच ५ ते १० किलोचा भला मोठा दगड येऊन पडला. सुदैवाने तो मोटारसायकलस्वार सहपत्नीक थोडक्यात बचावले.

गेल्या दोन महिन्यांपासून ब्लास्टींगचे काम सुरू असून, कोहिनूर मंगल कार्यालय परिसरातील वसाहत मधील नागरिक व महिलांसह वयोवृद्ध व्यक्ती आणि चिमुकली मुले जीव मुठीत घेऊन जीवन जगत आहेत.



दररोज ब्लास्टींग सुरु असताना सकाळी पासून ते संध्याकाळी पर्यंत वसाहत लगत व बासलेगाव रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दगड पडले. संबंधित रस्ता ठेकेदारांच्या सहकारी इंजिनिअर व कामगारांनी संगनमताने हे अवैध ब्लास्टींग मयार्दा पेक्षा जास्त उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

तर परिसरातील मंगल कार्यालयाचे संचालक उरुजपाशा पिरजादे, नागराज कुंभार, प्रशांत गुरव, सुनील गोरे, सिध्दाराम पाटील, इनायत शेख, रमेश शिंदे, दिगंबर साळुंखे, गुरप्पा कुंभार, सुनील आळंद, अविनाश कोरे, विजयकुमार मलंग, विकास जकापुरे, संगमेश्वर स्वामी, सचिन डिग्गे, शशिकांत कुंभार, करेप्पा रोळ्ळी, अलका दसले, उज्वला फडतरे, विजयालक्ष्मी कुंभार यांच्या घरांना तडे गेले आहेत. सूरत ते चेन्नई सुपर रस्ता काम करणाऱ्या कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी, या मागणीसाठी येथील वसाहत मधील नागरिक व महिलांनी अनेकवेळा कंपनीसह शासन लोकप्रतिनिधींना तोंडी सांगितले आहे, आता निवेदने देण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे या अवैध ब्लास्टींग उडविण्याचे बाबतीत पोलिस निरीक्षक दीपक भिताडे यांनी सुद्धा या वसाहत मधील नागरिकांच्या तोंडी तक्रारीची दखल घेऊन ठेकेदारांच्या मुनिमास सूचना दिल्या आहेत. तरी सुद्धा त्या सूचना ची पायमल्ली केली जात आहे. म्हणून तहसीलदार व लोकप्रतिनिधी यांनी संबंधित ठेकेदारास ब्लास्टींग उडविण्याऐवजी पर्यायी मार्ग निवडण्याची सूचना द्यावी, अशी वाढती मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

गेल्या वर्षभरापासून सूरत ते चेन्नई रस्ता कामकाज सुरू असून मात्र एक - दोन महिन्यांपासून दिवस व रात्र वसाहत परिसरात अवैध ब्लास्टींग उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. याकडे तहसील प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. तरी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन अवैध ब्लास्टींग उडविण्याचे कामास पायबंद घालण्यासाठी सूचना द्यावी, अन्यथा या परिसरातील श्री वटवृक्ष गणेश मंडळाच्या वतीने नागरिकांनी आंदोलन करणार असल्याचे सांगितले.

माझी शेती सूरत ते चेन्नई महामार्गाच्या दोन्ही बाजूला आहे. या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग घेत असल्याने धुळीमुळे पीकांचे नुकसान होत आहे. तसेच गेल्या वर्षभरापासून दोन एकर शेतजमीन मध्ये पावसाचे पाणी थांबले आहे. यामुळे सदरची दोन एकर शेतजमीन नापीक झाले आहे. यामुळे सुमारे दोन लाख रुपये किंमतीची नुकसान झाले आहे.

सदर नुकसान कंपनीने भरून द्यावे, याबाबत कंपनीकडे वारंवार मागणी केली आहे. मात्र माझ्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. नुकसान भरपाई दिली नाही तर याबाबत निवेदन देऊन उपोषणासाठी बसणार आहे.

**- अहमदपाशा पिरजादे,** शेतकरी, नागनहळ्ळी.